महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५
दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल: pmu@mahapocra.gov.in

जा. क्र.: NDKSP-१६०२४(१३)/६/२०२५-१६/कृ.अ. दि.०७/ ०१ /२०२६

प्रति,

विभागीय कृषि सहसंचालक,
छत्रपती संभाजीनगर, अमरावती, लातूर, नागपूर, नाशिक.

**विषय:-** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोन अंतर्गत मृद व जलसंधारण कामांसाठी सविस्तर अंदाजपत्रकात २ % आकस्मिक खर्च समाविष्ट करून खर्च करण्याच्या कार्यपद्धतीबाबत.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र.- कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-८A दि. ०८.०७.२०२५.
२) शासन पत्र क्र.- संकीर्ण-२०१७/प्र. क्र.४८६/जल-७ दि. २८.१२.२०१७
३) संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. मृदसं /मृद-६/ई-निविदा/१८५/१९, दि. २१.०१.२०१९

महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येणाऱ्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ साठी दि. ०८.०७.२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता प्राप्त होऊन प्रकल्प अंमलबजावणीस सुरुवात झालेली आहे. सदर प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांमध्ये सूक्ष्म नियोजन प्रक्रियेद्वारे तयार करण्यात आलेल्या गाव अनुकूल आराखड्यांमध्ये (VAP) पाण्याच्या ताळेबंदावर आधारित प्रस्तावित केलेले मृद व जलसंधारण कामे राबविणे प्रस्तावित आहे.

संदर्भ क्र. २ व ३ च्या अनुषंगाने ना.दे.कृ.सं. प्रकल्पामध्ये मृद व जलसंधारणाची कामे ई-निविदा पद्धतीने राबविण्यासाठी अंदाजपत्रकात एकूण २ % रक्कम आकस्मिक खर्च म्हणून समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर २% रकमेपैकी १.५०% रक्कम कामाची मोजणी करणे, मोजणी अंदाजपत्रक तयार करणे, सर्वेक्षण करणे, सविस्तर अंदाजपत्रके तयार करणे तसेच मंजूर सविस्तर अंदाजपत्रकाच्या प्रमाणित चार प्रती तयार करणे इत्यादी कामांसाठी देय राहील. तसेच ई-निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने जाहिरात प्रसिद्धी करणे या करिता ०.५० % निधी देय राहील.

त्या अनुषंगाने प्रकल्पांतर्गत मृद व जलसंधारण कामांसाठी तांत्रिक मान्यताप्राप्त रकमेच्या २ % रक्कम उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या स्तरावरून खालील कार्यपद्धतीचा अवलंब करून संबंधितास अदा करण्यात यावी.

१. मृद व जलसंधारण कामांना प्रकल्पाच्या NRM पोर्टलवर तांत्रिक मान्यता असणे आवश्यक आहे.
२. १.५० % व ०.५० % ही उच्चतम मर्यादा असून प्रत्यक्ष प्रमाणकानुसार देयके अदा करण्यात यावे.
३. सदरचा निधी अग्रीम म्हणून काढण्यात येवू नये.

संबंधित रक्कम विहित लेखा पद्धतीचा अवलंब करून मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदीच्या मर्यादेत व शासनाने विहित केलेल्या आर्थिक नियमावली व मार्गदर्शक सूचनांनुसार अदा करण्यात यावी.

Parimal 7/1/26

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

**प्रत:-** १. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे यांना माहितीस्तव.
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पातील सर्व ) यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.
३. उपविभागीय कृषि अधिकारी (प्रकल्पातील सर्व ) यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्त